● शनिवार, दि २८ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## विधानसभा २०१९ निवडणुकीत कुणाला मतदान केलं होतं?

### सर्वेक्षणात प्रश्न; धर्म, जातही जाणून घेण्यात रस; उद्देश काय? गोपनियतेचा भंग नाही का?

**दीपक शेळके**

**जालना** - विधानसभा २०२४ च्या निवडणुकांची घोषणा आगामी ऑक्टोबर महिन्यात कधीही होण्याची शक्यता एकीकडे वर्तविली जात आहे. तर दुसरीकडे विविध राजकीय पक्षांकडुन सर्वे क्षणावर भर दिला जात आहे. प्रत्यक्ष भेटी सह मोबाईल फोनवर कॉल करुन हे सर्वे क्षण केले जात आहे. हे सर्वेक्षण विविध संस्थांकडून करुन घेतल्या जात आहे. सर्वे क्षणात विधानसभा २०१९ निवडणुकीत कुणाला मतदान केले होते. या प्रश्नासह धर्म, जात जाणून घेतल्या जात आहे. हा गोपनीयतेचा भंग होत नाही का? किंवा धर्म आणि जात विचारण्याचा नेमका उद्देश काय? असा प्रश्न निर्माण होत असून सर्वे क्षणाच्या कॉलला उत्तर देतांना नागरिक बुचकाळ्यात पडत आहेत. दुसरीकडे पक्ष आणि उमेदवारांच्या नावाबाबत हेच का? किंवा यांना का टाळण्यात आले असे प्रश्न सर्वेक्षण करणाऱ्यांना विचारल्यास याचे उत्तर त्यांच्याकडे नाही.

विधानसभा २०२४ निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून महायुती व महाविकास आघाडीचीही जोरदार तयारी सुरु आहे. प्रत्येक राजकीय पक्षाकडून आपणच जिंकणार असल्याचे दावे करण्यात येत आहेत. विविध राजकीय पक्षांकडुन उमेदवारांची चाचपणी करण्यासह निवडणुकीतील संभाव्य स्थिती जाणून घेण्यासह अन्य कारणांसाठी सर्वेक्षण सुरु आहे. मात्र, या सर्वेक्षणात विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये अनेक प्रश्न ही गोपनीयतेचा भंग करणारी आहेत. अशी प्रश्न विचारण्याचा अधिकार यांना आहे का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो आहे. धर्म आणि जात याबाबत नागरिकांना नावानिशी विचारल्या जात आहे. निवडणुक आयोगाकडुन या संदर्भाने नेमक्या काय सुचना आहेत. यावरही विचार करण्याची वेळ आली आहे.

विविध संस्थांकडुन होणारे सर्वेक्षण हे राजकीय पक्षांकडुन अथवा मिडीयाकडुन, करण्यात येते. अशावेळी या संस्थेकडुन होणारे सर्वेक्षण आणि त्या निमित्ताने त्यांच्याकडे निर्माण होणारा डाटा यामुळे संबंधीत पक्षाकडे नावानिशी, धर्म, जात याविषयीची माहिती उपलब्ध होणार आहे. सर्वेक्षण करणाऱ्या संस्थांकडे उपलब्ध असलेल्या डाटामुळे भविष्यात निवडून येणाऱ्या अथवा निवडणुकीत हरणाऱ्या उमेदवारांकडून विशिष्ट धर्म, जात, व्यक्तीस नुकसान पोहचण्याचा धोका निर्माण झाला आहे. सर्वेक्षण करणाऱ्या संस्थाकडुन याची गोपनीयता ठेवली जाईल का हा ही गंभीर प्रश्न आहे. ही सर्व परिस्थिती पाहता प्रशासनासह निवडणुक आयोगाने या सर्व प्रकाराची चौकशी करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

## पीकविमा कंपनीकडुन शेतकऱ्यांची फसवणूक

### शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी** - अतिवृष्टी व ढगफुटीमुळे नुकसान झालेल्या पीकविम्यासाठी कंपनीकडून नुकसानीची तारिख व पंचनाम्याची तारीखेचा घोळ घातल्या जात आहे. शेतकऱ्यांना धमकावत ७२ तासांची असलेली मर्यादा ओलांडण्यात येत आहे. ही शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक असल्याचा आरोप करत पीकविमा कंपनीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना शुक्रवार (दि २७) रोजी निवेदन देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पीकविमा कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. universal sompo general insurance company ने खरीपमध्ये पीकविमा घेतला आहे. दि.०२/०९/२०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टी अन् ढगफुटीमुळे शेतपिकांचे नुकसान झाले. त्यासाठी कंपनीच्या नियमानुसार ७२ तासाच्या आत कंपनीला पुर्व सुचना देणे शेतकऱ्याला बंधनकारक होते. आणि शेतकऱ्यांनी कंपनीच्या नियमाप्रमाणे केलेही; परंतु कंपनीच्या पंचनामा फॉर्म वर नुकसान तारीख ०२/०९/२०२४ असुन सूचना तारीख दि. ०८/०९/२०२४ आहे. म्हणजेच ७२ तासांची मर्यादा ओलांडली आहे. आणि त्यामुळे कंपनीच्या नियमानुसार शेतकरी विम्यास अपात्र ठरत आहे. हि शेतकऱ्यांची शुध्द फसवणूक आहे. पीकविमा कंपनीने अर्ज घेऊन विमा प्रतिनिधी गावात पाठवले व कोऱ्या अर्जावर शेतकऱ्यांना सह्या करण्यास भाग पाडले. सही करण्यास नकार देणाऱ्या शेतकऱ्यांना धमकविल्या गेले. त्यांच्यासह अरेराईची

पान २ वर



## रात्रीला ड्रोनच्या घिरट्या; ग्रामस्थ भयभित

### राष्ट्रवादी काँग्रेसची तहसीलदारांना निवेदन



**दत्ता देशमुख**

**जाफराबाद । प्रतिनिधी** - तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून अनेक गावावर रात्रीच्या वेळी ड्रोन घिरट्या घालत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. याविषयी स्थानिक प्रशासनाने खुलासा करून जनतेत निर्माण झालेले भीतीचे वातावरण कमी करावे.अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रामधन कळंबे यांनी जाफराबाद च्या तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की १८ सप्टेंबर रोजी कुंभारी येथील भारत मोरे व विष्णू जंजाळ यांच्या घरावर धाडसी दरोडा पडला होता, त्यातील संशयितास ग्रामस्थांच्या मदतीने धाडसी युवकांनी एकास पकडले होते तर ३ जण फरार झाले होते. आरतखेडा येथील शेतमजूरी करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील पोत तोडून पळ काढला होता. जाफराबाद शहरातही भरदिवसा अनेक ठिकाणी

पान २ वर

## युवा आदर्श

### मूळ...

पुरे आता वाचळता
चाखवा शत्रूस धूळ
त्याचं रड गाण्याचे
उखडून टाका रुळ
विषारीवृक्ष तोडाया
शोधायचे खरे मूळ
झिडकारले त्या घरा
का झाडता पायधूळ
पोटात साठली घाण
कितीदा भरालं चूळ
पुन्हा बळावे व्याधी
पाणी अशुध्द मचूळ
आपलेचं करे शोषण
पोसत राहे बांडगूळ
समोरचे कसे जिंके
उगाचं उठे पोटशूळ
पहा फरक पडे कसा
ठेवावा जरासा गूळ
निवडणूकीस इच्छुक
मुग्यांनी गच्च वारुळ
अंगलट येते उगाचचं
नॅरेटिव्हचे नवे खूळ
खरी कारणे शोधावी
पक्ष का होतो ठिसूळ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## 'मुख्यमंत्री योजनादूत'; अर्ज करण्यास ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

**मुंबई** - शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता मुदतवाढ देण्यात आली असून आता इच्छुक उमेदवारांना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत

पान २ वर

## टेंभुर्णीचे भूमिपुत्र डॉ. गणेश चंदनशिवे यांना मराठवाडा रत्न पुरस्कार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - येथील भूमिपुत्र, नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, सिने अभिनेते लोककलावंत,, गायक, कवी, गीतकार, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख, विविध राज्यात प्रदेशात लोककलेचे महत्त्व पटवून देणारे, लोककलेची सेवा म्हणून त्यासाठी वाहून घेणारे, तमाशा कलावंतांवर पीएचडी करणारे, डॉक्टर गणेश चंदनशिवे यांना मानाचा तुरा म्हणून मराठवाडा जनविकास परिषद ठाणे मार्फत दिल्या जाणारा मानाचा पुरस्कार,



मराठवाडा रत्न म्हणून पुरस्कार जाहीर झाला असून टेंभुर्णीच्या शिरतेचा मानाचा तुरा पडलेला आहे. इथे २९ सप्टेंबरला रविवारी त्यांना ठाण्याच्या गडकरी रंगायेतन मध्ये त्यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक दिल्या जाणार आहे. हा पुरस्कार त्यांना महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री इनामदार एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या हस्ते तुझ्या जाणार आहे. त्यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे तो निर्णय आनंदाचे वातावरण असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन

पान २ वर

## संदीप साबळे व पदाधिकाऱ्यांच्या प्रवेशामुळे ताकद मिळाली - खोतकर

**जालना । प्रतिनिधी** - शहरात श्रीमंतसंघटनेचे मोठे जाळे असून या संघटनेचे प्रमुख संदीप साबळे व संघटनेचे सर्व पदाधिकारी महीला कार्यकर्त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे आपल्याला मोठी ताकद मिळाली असून या संघटनेने माझ्यावर व शिवसेना पक्षावर योग्य वेळी जो विश्वास दाखवून शिवसेनेत प्रवेश केला त्यामुळे मी श्रीमंत संघटनेचे प्रमुख संदीप साबळे व त्यांच्या सर्व संघटनेच्या बंधू-भगिनीचे मनापासून शिवसेना पक्ष स्वागत करतो. व त्यांना शुभेच्छा देतो. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर योग्य वेळी विश्वास दाखवून शिवसेना पक्षात प्रवेश केला त्यांचा या पक्षात योग्य सन्मान केला जाईल, त्यांचा विश्वासघात होणार नाही अशी ग्वाही देतो, असे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्रीअर्जुनराव खोतकर यांनी पक्षप्रवेश सोहळ्या दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले.

श्रीमंत संघटनेचे प्रमुख संदीप साबळे यांनी व त्यांच्या सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाजत गाजत मिरवणूक काढून शिवसेना पक्षात दर्शना बंगल्यावर अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीमध्ये जाहीर प्रवेश केला. सर्वांचे अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत केले .यावेळी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, दलित आघाडी शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव मगरे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, महिला आघाडी शहर प्रमुख उज्वलाताई फोपलीया ,माजी नगरसेवक निखिल पगारे, विजय जाधव, संजय गायकवाड, ॲडवोकेट आस्पाक पठाण, माजी नगरसेवक विजय जाधव, ॲडवोकेट बबन मगरे, ताहेर खान, युवा सेनेचे राहुल, वैद्य दिपक गवारे,कुणाल जाधव, जाफरखान संतोष परळकर यांची उपस्थिती होती.

### विद्यमान आमदारांचे दलित-मुस्लीमांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष - साबळे

प्रसंगी श्रीमंत संघटनेचे प्रमुख संदीप साबळे म्हणाले की, आम्ही संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सतत सहभागी असतो संघटनेच्या माध्यमातून गोरगरिबाचे प्रश्न सोडवण्यासाठी काम करतो. विद्यमान आमदार दलित मुस्लिमांच्या मतावर निवडून आले आहेत. परंतु त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात प्रश्न सोडवण्याचे काम तर दूरच परंतु कधी त्यांची साधी भेटही होत नाही. त्यामुळे आपण व आमच्या संघटनेने जनसेवेचे सतत कार्य करणारे सामान्याचे प्रश्न सोडवणारे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या पाठीमागे ठामपणे उभा राहून येणाऱ्या निवडणुकीमध्ये त्यांना भरघोस मताधिक्याने निवडून आणायचे असा निर्धार केलेला आहे. यावेळी ॲड. भास्करराव मगरे, माजी नगरसेवक निखिल पगारे यांनी देखील मार्गदर्शन केले.



परतूर विधानसभा मतदारसंघात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत २४२५ घरकुल मंजूर

# ३० कोटी २६ लाख ४० हजार रुपये निधी मंजूर - माजी मंत्री आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता परतुर विधानसभा मतदारसंघात २४२५ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून वैयक्तिक घरकुल लाभार्थ्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता आणि सदरहू लाभार्थ्या करिता प्रति लाभार्थी ०१ लाख २० हजार रुपये प्रमाणे २९ कोटी १० लाख रुपये तर ४ टक्के प्रशासकीय निधी रुपये ४८०० प्रति घरकुलाप्रमाणे रुपये असे एकूण १ कोटी १६ लक्ष ४० हजार इतक्या निधीस मान्यता देण्यात आली असून प्रति घरकुलास प्रत्येकी ४८२६ रुपये प्रमाणे ०१ कोटी १७ लाख ३ हजार ५० रु एकूण ३० कोटी २६ लाख ४० हजार इतका निधी प्राप्त झाला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात दिली आहे

मागील अनेक दिवसांपासून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत घरकुलांच्या मंजुरी संदर्भातील मागणी केली जात होती त्यानुसार आमदार लोणीकर यांनी सदरील विभागाकडे या संदर्भातील पाठपुरावा करून या घरकुलांना मंजुरी मिळवून दिली आहे या योजनेअंतर्गत वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना मान्यता देण्यात आली असून जिल्हास्तरीय समितीने छाननीअंती सदरील घरकुलांना प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याचे देखील लोणीकर यांनी स्पष्ट केले

जालना जिल्ह्यात एकूण ५१८० घरकुल मंजूर करण्यात आले असून त्यापैकी परतुर विधानसभा मतदारसंघात २४२५ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे जालना जिल्ह्यातील एकूण घरकुलांसाठी ६४ कोटी ६४ लाख ६४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी एकट्या परतुर विधानसभा मतदारसंघासाठी ३० कोटी २६ लाख ४० हजार रुपये निधी मंजूर मंजूर करण्यात आला असल्याची माहिती देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे

परतुर विधानसभा मतदारसंघात अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना १८४८ घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्यासाठी प्रत्येकी १ लाख २० हजार रुपये प्रमाणे २२ कोटी १७ लाख ६० हजार रुपये प्राप्त झाले आहेत. या दोन्ही योजनांमध्ये ४२७३ घरकुलांना मंजुरी देण्यात आला असून त्यासाठी एकूण ५२ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, अशी माहिती देखील माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने देण्यात आलेल्या प्रसिद्ध पत्रकात दिली आहे



संबंधित सर्व लाभार्थी विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील वैयक्तिक जात प्रमाणपत्र धारक असणे बंधनकारक असून अशाच व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार आहे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देताना संदर्भीय शासन निर्णय व शुद्धिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या अटी शर्तींचे उल्लंघन करता येणार नाही तसेच या लाभार्थ्यांच्या सर्व कागदपत्रांची व अटींची पूर्तता झाल्याची खातरजमा झाल्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश वितरित करण्यात येतील असेही लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे

# ई बी के उर्दू विद्यालयात भाषण स्पर्धेत विद्यार्थी चमकले




**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील सेठ एकनाथ भगवानदास उर्दू विद्यालयात प्रेषित मोहम्मद स. च्या सीरत वर भाषण भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या भाषण स्पर्धेत वर्ग पहली ते दहावी च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. या भाषण स्पर्धेत पर्यवेक्षक म्हणून मुफ़्ती जाबीर, हाफ़िज़ शोएब, हाफ़िज़ फ़ारूक़ व इदरीस खान यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शेख ज़मीर तर प्रमुख पाहुने म्हणून हाजी मोइन बागवान, शेख गयास यांची उपस्थिति होती.

यावेळी करण्यात आलेल्या तीन गट पहली ते चौथी क गटातुन बुशरा साबेरोद्दीन शेख़ हिने प्रथम, आरिश शाकेर सिद्दीकी याने द्वितीय तर ज़ुनेरा सय्यद मोबीन तृतीय वर्ग पाचवी ते सातवी ब गटात अलफैज़ रहेमान कुरेशी प्रथम, शारीया नजमोद्दिन शेख़ द्वितीय, असरा फेरोज़ शेख़ तृतीय तसेच वर्ग आठवी ते दहावी अ गटात अश्मिरा खाजा पठाण प्रथम, अदीबा फेरोज़ शाह द्वितीय आणि सबा रहेमान कुरेशी हिने तृतीय क्रमांक पटकावला, सर्व विजेता विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# ८.७२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड

**मुंबई -** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.७२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि. २८ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. २९ ऑक्टोबर, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळविले आहे. परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने वरील दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. २९ ऑक्टोबर, २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४(२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.७२ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली., असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत. भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केलें जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे. रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोकऋण कार्यालय हे, शासकीय कोषागाराचे काम करणाऱ्या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/ उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

# सिद्धार्थ महाविद्यालयात वाड्;मय मंडळाचे उदघाटन

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वांड्.मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी प्रोफेसर डॉ. राम रवणेकर उद्घाटक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र.तु. देशमुख हे होते .प्रमुख उपस्थितीमध्ये वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. सुनिल मेढे ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे ,यांची उपस्थिती होती.

भाषणात आपले विचार मांडत असताना डॉ. राम रवणेकर म्हणाले की, मराठी साहित्याचे दालन हे खूप समृद्ध आहे यामध्ये ज्ञानेश्वर, तुकोबाराय यांच्या अभंगाची आठवण करून देताना व आजच्या सामाजिक परिस्थितीची बदललेली अवस्था पाहता त्यांनी खंत व्यक्त केली. ज्यामध्ये आज माणूस माणसापासून पूर्णतः दुरावत चालला आहे. याला जोडण्याचे काम संत साहित्य करू शकते असे प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे भाषा व साहित्य भारताच्या तसेच भारतातील प्रत्येक व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक आहे हे वाङ्मयाच्या माध्यमातूनच शक्य आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोफेसर डॉ.विजय पाटील यांनी करते वेळी भाषेचा गौरव करताना व वाङ्मयाचा इतिहास मांडताना संत साहित्यापासून आजपर्यंतच्या आधुनिक काळातील साहित्यिकां पर्यंतचा इतिहास मांडला. यामुळे संपूर्ण वाङ्मयात एक नवचैतन्य निर्माण करणाऱ्या नवोदित कवी ,साहित्यिक यांना प्रोत्साहनच मिळेल असे मत व्यक्त केले .महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाड्ंग़्याची गोडी लागावी याकरिता सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजे असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षिय भाषणांत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र.तु.देशमुख यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाच्या मुला मुलींमध्ये वाङ्मयाची गोडी लागण्याकरिता संत साहित्यापासून ग्रामीण साहित्य व आधुनिक साहित्यापर्यंत च्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला .वाङ्मय मंडळाची निर्मिती महाविद्यालयात करण्याचा उद्देश विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये साहित्याची आवड निर्माण व्हावी यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मराठीचे अद्य् कवी मुकुंदराज यांच्या विवेकसिंधु ग्रंथापासुन आधुनिक काळातील नवोदित कवी, कांदबरीकार, कथाकार,नाटयलेखका पर्यंत साहित्याचा आढावा घेतला.या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रके तयार केली त्यांचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन कु. शालिनी वाघ, कु. हर्षदा तांबेकर यांनी केले या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी,शिक्षक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार हिंदी विभागाचे प्राध्यापक अनिल वैद्य यांनी मानले. व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## केंद्र सरकारनं, कामगारांच्या किमान वेतन दरात वाढ करण्याची केली घोषणा

**नवी दिल्ली -** कामगारांना, विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना आधार देण्याच्या उद्देशानं एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून केंद्र सरकारनं, परिवर्तनीय महागाई भत्त्यामध्ये सुधारणा करून किमान वेतन दरात वाढ करण्याची घोषणा केली आहे. कामगारांचा वाढता खर्च भागवण्याच्या उद्देशानं हा निर्णय घेण्यात आला आहे. इमारतीचं बांधकाम करणारे, माल भरणारे आणि उतरवणारे, चौकीदार, साफसफाई, घरकाम, खाणकाम, कृषी या क्षेत्रातील केंद्रीय क्षेत्रातील आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुधारित वेतन दरांचा फायदा होणार आहे. नवीन वेतन दर १ ऑक्टोबर २०२४ पासून लागू होणार आहेत.

पान १ वरुन

## पीकविमा कंपनीकडुन ...

भाषा वापरली. अर्जावरील सूचना तारखे विषयी विचारले असता वेगवेगळी उत्तरे शेतकऱ्यांना दिली गेली. जिल्ह्यातील मोतीगव्हाण येथेही नुकतेच (दि. १५) दोन विमा प्रतिनिधी आले. या विमा प्रतिनिधींनी शेतकऱ्यांकडुन कोऱ्या अर्जावर सह्या घेतल्या. विशेष म्हणजे या विमा प्रतिनिधींकडे ओळखपत्र नव्हते. गावकऱ्यांनी यावर विमा प्रतिनिधींना याबाबत विचारणा केली. मात्र, त्यांच्याकडुन योग्य उत्तर मिळाले नाही. त्यांनी वरिष्ठांशी जवळपास तीन तास चर्चा केली. असे असतांनाही सूचना तारखेच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. ही विमा कंपनीकडुन शेतकऱ्यांची फसवणूक असुन तात्काळ फसवणुक करणाऱ्या कंपनीवर व दोषीवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आली असून काही पुरावे निवेदनासोबत देण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

अशाच पद्धतीने २०२३ खरीप व रब्बी पिक विम्यात देखील शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. यातील पीकविम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम देण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली आहे. दोन्ही विषयांचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. यावेळी शेतकरी संघटनेचे नेते दत्तात्रय कदम, जिल्हाध्यक्ष शिवाजी लकडे, अंजुभाऊ चव्हाण, नितिन कानडे शेतकरी, किरण वाळके, समाधान वानखेडे, गजानन तौर, गणेश कदम सह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## रात्रीला ड्रोनच्या ...

घरफोड्या झाल्या आहेत, मागिल काही महिन्यांपूर्वी अनेक व्यापाऱ्यांचे गोडाऊन फोडून धान्य लंपास केले आहेत.काही शेतकऱ्यांच्या बैलजोड्या चोरीस गेल्या आहेत.वारंवार घडणाऱ्या या चोरीच्या घटनांमधून घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तालुक्यातील अनेक गावात रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेरे घिरट्या घालून टेहळणी करत असून, नेमके हे ड्रोन कोण फिरवत आहे? याचा वापर घरफोड्या व चोऱ्या करण्यासाठी होतो का?असे एक ना अनेक प्रश्न असून, याविषयी अधिकृत माहिती कोणताच विभाग देत नाही. चोरीच्या घडलेल्या घटना, रात्री अपरात्री फिरणारे ड्रोन यामुळे ग्रामीण भागातील नागरिक रात्र जागून काढवी लागत आहे. त्यामुळे ड्रोन विषयी खुलासा करून नागरिकांत निर्माण झालेले भीतीचे वातावरण दूर करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी शेख मुजीब, रामदास जाधव, दिलीप लोखंडे, विठ्ठल गोरे यांच्यासह कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री योजनादूत ...

इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज डीलाळीं करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

## टेंभूर्णीचे भुमिपूत्र ...

केले आहे. लोकनाट्य मंडळाचे दिग्दर्शक तथा आदर्श शिक्षक शिक्षण, येत रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे तसेच नाट्य कलावंत उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, माजी उपप्राचार्य मधुकरराव झटे, विश्वनाथराव सांगळे, प्रसिद्ध चित्रकार तथा कलावंत संतोषबाबुराव औटी, संतोष घोडके, गणपत भिताडे, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राची जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अशपाक, सचिव बालाजी शेवाळे, नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक विश्वनाथराव सांगळे, अरुण जाधव, दिनकर चंदनशिवे, दिनकर उखर्डे,अलकेश सोमानी, नसीम शेख, दत्ता गवळी, समाधान दूनगहू, बाळकृष्ण धनवई, गणेश धनवाई, विजय काटोळे,मुकुंद आवटी, शरद गवळी, संजय राऊत, विजय सातभाई, सतीश उखर्डे, तसेच कलेवर प्रेम करणाऱ्या सर्वांनी त्यांच्या अभिनंदन केले.

# खर्डा येथे २५ कोटींच्या कामांचे भुमिपूजन व लोकार्पण

## आ.रोहित पवार यांच्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन

**जामखेड । प्रतिनिधी -** कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्या विशेष प्रयत्नांतून जामखेड तालुक्यातील खर्डा येथे एकूण २५ कोटी १५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम देशाचे माजी कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. खा. श्री. शरदचंद्र पवार आणि कोल्हापूर लोकसभेचे मा. खा. श्री. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज मा. श्री. युवराज भूषणसिंहराजे होळकर, अहिल्यानगरचे मा. खा. श्री निलेश लंके, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष मा. श्री. प्रवीणदादा गायकवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा ऐतिहासिक सोहळा खर्डा येथील शिवणपट्टण किल्ल्यावर शनिवारी (२८ सप्टेंबर) दुपारी ३ वाजता होणार आहे.



आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून मतदारसंघात गेल्या पाच वर्षात कोट्यावधी रुपयांची विविध विकासकामे मंजूर करून ती पुर्ण करण्यात आली. यावेळी ७ कोटी रुपये खर्चाच्या शिवणपट्टण किल्ल्याचे मजबुतीकरण व दुरुस्तीकरणाचे काम लवकरच सुरु करण्यात येणार असून या कामाचं भूमिपूजन करण्यात येणार आहे. यासोबतच ३ कोटी १५ लाख रुपये खर्चाच्या वखार महामंडळाच्या गोदाम बांधकामाचे आणि १५ कोटी रुपये खर्चाच्या खर्डा ते जामखेड रस्त्याचे काम पूर्ण झालं असून या विकासकामांचे लोकार्पण मा.खा.श्री शरदचंद्र पवार साहेब आणि मा.खा. श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थित होणार आहे. यावेळी मा. श्री. युवराज भूषणसिंहराजे होळकर, खा.निलेश लंके, प्रविणदादा गायकवाड हे देखील उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यात इतिहासाशी संबंधित तीन महत्त्वपूर्ण पुस्तकांचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सध्या जोरदार तयारी चालू असून मतदारसंघातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी आमदार रोहितदादा पवार मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

तात्मा जनार्दन मामा नागापूरकर स्पर्धा

# पूर्व माध्यमिक गटात जे बी के विद्यालयाचा संघ प्रथम, माध्यमिक गटात संघ द्वितीय





**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील श्रीमती जेबीके व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय दिल पूर्व माध्यमिक गटाचा संघ हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर वाढदिवस स्पर्धेच्या केंद्रस्तरीय प्रथम क्रमांक पटकावला आहे. संघातील विद्यार्थिनी कुमारी प्राची गाडेकर, कुमारी कार्तिकी गायके, तसेच माध्यमिक गटामध्ये जे बी के विद्यालयाचा संघ आला आहे. संघातील विद्यार्थिनी होत्या कुमारी श्रावणी मघाडे, कुमारी भक्ती साळवे. या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे शिक्षक बोरकर सर, भीवसन ससाने सर, संजय अनंतराव कुलकर्णी, आदींनी मार्गदर्शन केले आहे. या यशस्वी विद्यार्थिनीचे संस्थेचे अध्यक्ष संजय जी काबरा, उपाध्यक्ष जमीर सर, संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी, संस्थेचे कोषाध्यक्ष सुभाष राठी, संस्थेचे सन्माननीय जेष्ठ संचालक रामनारायण जी काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, संचालक तथा माझी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दिपक काबरा, संचालक मधुकरराव निकम, संचालक विश्वनाथराव सांगोळे, संचालक तथा उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, सर्व विश्वस्त, प्राचार्य नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाब सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराने, रमेश इंगळे विष्णू जाधव, कैलास भुतेकर, राजेंद्र जगताप, प्राध्यापक सुनील बनसोडे,प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे प्राध्यापक केजी जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, दत्ता उखर्डे,दिनकर उखर्डे, वासुदेव शिरसागर समाधान कांबळे, गणेश संवसाक्रे, आवटी मॅडम पाटील मॅडम भिलावेकर मॅडम,कळंबे मॅडम, शेख मॅडम, लंबे मॅडम, राजू डोमळे, दगडोबा तांबेकर नागोराव देशमुख, दीपक देशमुख आदींनी अभिनंदन केले आहे.

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारे कैलाश झोळगे यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** नागपूर येथील एनआयटी जलतरण तलावावर महाराष्ट्र राज्य वेटरेंस स्विमिंग एसोसिएशनच्या सिल्वर जुबली वर्षानिमित २१ ते २२ सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत जालना येथील राष्ट्रीय जलतरणपटू कैलाश झोळगे यांनी चमकदार कामगिरी करून जलतरणच्या



विविध प्रकारच्या स्ट्रोकसमधे एकूण चार सुवर्ण पदकाची कमाई करत सोनेरी चोकार लगावल्याबद्दल सिविल क्लब स्विमिंग पूल सदस्यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यातुन विविध व्योगटातील महिला व पुरुष जलतरणपटु सहभागी झाले होते. ४५ ते ५० वयोगटात जालना येथील राष्ट्रीय जलतरणपटु, प्रशिक्षक तथा क्रीडा मार्गदर्शक आणि विश्वकर्मा पुरस्काराने सम्मानित कैलाश झोळगे यांनी ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक,१०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, ४बाय ५० मीटर मिडले आणि ४ बाय ५० मीटर फ्री स्टाइल रिलेत सुवर्णपदक पटकावले. त्यांनी या स्पर्धेत चार सुवर्ण पदकांची कमाई करत स्पर्धेवर वर्चस्व गाजवले. कैलाश झोळगे यांनी मागिल २० वर्षात जालन्यातील अनेक शालेय विद्यार्थी, मुले, मुली, महिला आणि पुरुषांना शास्त्रोक्त पद्धतीने जलतरणाचे प्रशिक्षण दिले असून, अनेक राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळाडू घडविले आहेत. त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेतील चार सुवर्णपदकाची कमाई ही जालन्यासाठी अभिमानास्पद बाब असून, त्यांच्या अद्वितीय यशाबद्दल सिविल क्लब स्विमिंग पूल सदस्यांच्यावती प्रसिद्ध आड़त व्यापारी रमेशचंद्र तोतला यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जेईएस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जवाहर काबरा यांनी मनोगत व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले व नोव्हेंबर महिन्यात भोपाळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी अर्जुन गेही, बजरंग भक्कड़, रमेश मगरे, सुरेश मगरे, मनोज पित्ती, डॉ. संजय आंबेकर, डॉ. मिलिंद थत्ते, डॉ. कासट, श्री. साबळे, श्री. पांगारकर, श्री. तोष्णीवाल, श्री. चौधरी, श्री. रत्नपारखे, श्री. जाधव, श्री. मोरे, श्री. बोथरा, श्री. झा, शेख, गोरक्षक, श्री, चेंनुर, श्री. निकाळजे, श्री. अलोने आदींची उपस्थिती होती.

# जालना विधानसभा क्षेत्रात ५२० घरकुलांना मंजुरी

## भास्कर दानवे यांच्या प्रयत्नांचे फलित



**जालना । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत जालना जिल्हयातील ५१८० वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नुकताच शासनाने निर्णय दिला आहे, यामध्ये जालना विधानसभा (१०१) क्षेत्रातील विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजातील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी मा केंद्रिय राज्यमंत्री मा.श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच जालना विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे यांनी वारंवार पाठपुरावा करुन विधानसभा क्षेत्रातील वाघ्रूळ, बाजीउम्रद तांडा, सावंगी तलाव, दहीफळ, पिरपिंपळगांव, साळेगांव नेर, बठाण बु., पारेगांव, सामनगांव, धावेडी, वखारी वडगांव, निरखेडा तांडा, नंदापूर, घाणेवाडी, गवळी पोखरी, गोंदेगांव, वडगांव (वखारी) ,पानशेंद्रा, पाहेगांव, वरखेड सिं. , मजरेवाडी, वरुड, देवमुर्ती, मानेगांव जहागिर या गावांमधील एकूण ५२० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झालेले असून यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे राहणीमान उंचावे, त्यांचे उत्पन्न स्त्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त करून देणे. यासाठी त्यांना जमीन उपलब्ध करून तेथे वसाहत उभी करून देणे व त्या ठिकाणी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यावेळी गावकऱ्यांनी भास्कर आबांचा सत्कार करुन समस्त गावकऱ्यांच्या वतीने आभार मानले. या प्रसंगी भाजप जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायकजी मुळे, मुकेश चव्हाण, बद्रीनाथ वाघ, संजय डोंगरे, कृष्णा गायके, नागेश अंभोरे, दीपक पाडूळ, विष्णु राठोड, सुमित सुराडकर, यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोषण महाअभियान अंतर्गत राणी वाहेगाव येथे कार्यक्रम



**परतुर । प्रतिनिधी -** तालुक्यातील राणी वाहेगाव येथील अंगणवाडीत गुरुवार (दि २६) रोजी पोषण महाअभियान अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला आहे. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी गरोदर माता अश्विनी वंजारे, सरस्वती मानवतकर यांच्या ओटी भरण्यात आल्या.या नंतर गरोदर माता, स्तनदा माता यांनी आपल्या दररोजच्या आहारा मध्ये कोण कोणत्या पदार्थांचा उपयोग करावा या विषयी परवेक्षिका सोनाली लीपने व अंगणवाडी सेविका सुनीता मस्के यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. यावेळी जि.प.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कर्वा, तांगडे, गंगा सागरे यांच्या सह अंगणवाडी मदतनीस, गरोदर माता, स्तनदा माता आणि गावातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका व गावातील महिलांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना वानरे यांनी केले.

# बेमुदत उपोषणाला ग्रंथालय असोसिएशनचा पाठिंबा

**जालना । प्रतिनिधी -** सन-२०१२ पासून रखडलेल्या राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना श्रेणी बदल, नवीन वाचनालयांना मान्यता तसेच ३० सप्टेंबरपूर्वी अनुदानाचा पहिला हप्ता द्यावा अन्यथा ३० सप्टेंबर पासून छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रंथालय संघाने दिला आहे. या उपोषणास जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचा पाठिंबा आहे. राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या सन-२०१२ पासून विविध मागण्या विचारात न घेतल्याने वाचनालयांची वाढ खुंटली आहे. एवढेच नव्हे तर तुटपुंज्या अनुदानामुळे जवळपास २ हजार वाचनालये बंद पडली आहेत. सध्या सुरु असलेल्या ११४५० सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी तुटपुंज्या अनुदानातून मिळणाऱ्या पगारावर काम करत आहेत. विधिमंडळात घोषित केल्यानुसार ४० टक्के अनुदान वाढ, श्रेणी बदल व नवीन मान्यता याची अंमलबजावणी करावी. तसेच सांस्कृतिक धोरणा-२०२४ नुसार ग्रंथालय हे सांस्कृतिक मंत्रालयाकडे वर्ग करण्यात येऊ नये अशी मागणी जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी.बी.देशपांडे, सचिव देविदास जिगे, डॉ.राजशेखर बालेकर, मुकुंदा खंदारे, शाम शेलगांवकर, रावसाहेब अंभोरे, श्रीकांत काळे, राजाराम चव्हाण, काशिनाथ गायकवाड, प्रवीण देशपांडे, शैलेंद्र बदनापुरकर यांनी केली.

# मेस्कोकडून सुरक्षा रक्षक भरती

**जालना -** जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी मेस्कोकडून एकुण २४ सुरक्षा रक्षकांची भरती करण्यात येणार आहे. तरी इच्छुक माजी सैनिकांनी जालना जिल्ह्याचे पर्यवेक्षक कडुबा खांडेभराडे यांच्याशी संपर्क साधावा. असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी कळविले आहे.

# होतकरु विद्यार्थ्यांना 'सिद्धार्थ' च्यावतीने नोकरीची संधी



**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जाफराबाद येथे स्पर्धा मार्गदर्शन केंद्रामार्फत भाग्यलक्ष्मी रोलींग मील प्रायव्हेट लिमिटेड जालना.या कंपनीतर्फे दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी ठिक ११:०० वाजता कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.या मुलाखतीसाठी बी.ए.,बी कॉम,बी एस्सी,आय टी आय, ऑपियर/ उत्तीर्ण विद्यार्थी -विद्यार्थीनी उपस्थित राहु शकतात.ज्या विद्यार्थ्यांना या मुलाखतीसाठी सहभाग घ्यायचा असेल अशा विद्यार्थ्यांनी आपला ( ठएडणच् ) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाचे समन्वयक प्रोफेसर डॉ.विजय पाटील यांच्याकडे सादर करावा.या रोजगाराच्या संधीचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे अवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.टी.देशमुख,स्पर्धा मार्गदर्शन विभागाचे समन्वयक प्रोफेसर डॉ.विजय पाटील ,उप-प्राचर्य प्रोफेसर डॉ.सुनिल मेंढे ,उप-प्राचार्य डॉ.शाम सर्जे ,उप-प्राचार्य प्रा.विनोद हिवराळे यांनी केले आहे.





**ठाणे येथील अस्तित्व संस्थेच्यावतीने महानगर पालिकेतील सफाई कामगारांच्या जीवनावर आधारीत 'अंधे जहां के अंधे रास्ते' हे दोन अंकी नाटक जुना जालनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथे पार पडले. या नाटकाद्वारे समाजात सफाई कर्मचाऱ्याबद्दल आदर, सन्मान, आपुलकी वाढावी व त्यांच्या समस्या समाजाने लक्षात घ्यावे. तसेच समाजात शहर साफसफाई बद्दल असलेली उदासीनता व त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांना कामात होत असलेला त्रास याबद्दल नाटकात सादरीकरण केले. सफाई कामगारांत मुलांच्या शिक्षणाप्रती असलेली उदासिनता दाखवत शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न या नाट्य कलावंतांनी केला. प्रसंगी शहर महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, उपायुक्त, सहायक आयुक्त, सर्व अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक तसेच अधिनस्त सर्व सफाई कर्मचारी व त्यांचा परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती. नाटकाअंती आयुक्त श्री खांडेकर यांनी अस्तित्व संस्था-ठाणे यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचा सत्कार केला.**

# धनगर समाजासाठी जालना जिल्ह्यात ६९४३ घरकुल मंजूर

## आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष प्रयत्न



**जालना । प्रतिनिधी -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजना या धनगर समाजासाठी घरे बांधण्याच्या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने प्रशासकीय मान्यता दिलेल्या व सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण, जालना यांनी संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये शासनास सादर केलेल्या एकूण ६९४३ वैयक्तिक लाभार्थ्यांच्या प्रस्तावास संबंधित शासन निर्णयातील अटी शर्तींच्या अधिन राहून शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात आली असून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विशेष विशेष प्रयत्नाला यश आल्याने धनगर समाजात समाधानाचे वातावरण पसरले असून जालना जिल्ह्यातील अनेक धनगर समाज बांधव माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानत आहे. धनगर समाज बांधवांना त्यांची हक्काची घर मिळावी याकरिता आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना अनेकदा भेटून पत्र देऊन जालना जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांच्या घरकुलाचा प्रश्न सोडविण्याची विनंती केली होती. याबाबतीत जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनातही आमदार बबनराव लोणीकर यांनी आढावा बैठक घेतली होती. जालना जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांना प्रती लाभार्थी रू.१.२० लक्ष व ४ टक्के प्रशासकीय निधी प्रमाणे एकूण रु. ८६,६४,८६,४००/- (अक्षरी रुपये श्याऐंशी कोटी चौसष्ट लक्ष श्याऐंशी हजार चारशे फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदयस्थितीत विभागाकडे उपलब्ध निधी लक्षात घेता, एकूण निधीपैकी रु.६,०६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी सहा लाख फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी या योजनेंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येनार आहे.

# शिवसेना महिला आघाडी मजबुत करा

## उपनेत्या संजना घाडी यांचे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन; शिवसेना महिला आघाडीचा स्त्रीशक्ती संवाद मेळावा

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडी जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने जालना शहरातील शिवसेना भवनात स्त्रीशक्ती संवाद' मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना उपनेत्या संजना घाडी, उपनेत्या अस्मिता गायकवाड, पक्ष निरीक्षक प्रियंका घाणेकर व सोनम जामसुदकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज २७ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील जालना, बदनापूर, भोकरदन, परतुर, घनसावंगी विधानसभा मतदार संघांतील महिला पदाधिकार्यांचा आढावा घेतला. यावेळी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, वैलास पुंगळे, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगल मेटकर, सुमनताई घुगे, गंगुताई वानखेडे, आयोध्या चव्हाण, शितल गव्हाड, मंजुषा घायाळ, शोभा पुंगळे, पुजा टेहरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतांना उपनेत्या संजना घाडी म्हणाल्या की, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष महिलांचा प्रचंड आदर सन्मान करणारा पक्ष आहे. महिलांनी मोठ्या संख्येने जिल्ह्यातील संघटन मजबुत करावे. एकुण मतदार संख्येत म हिलांची संख्या ही निम्मी आहे. त्याम ुळे पुरुषांच्या बरोबरीनेच महिलांचे संघटनही बळकट असणे गरजेचे आहे. आगामी काळात शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदी बसवयाचे आहे. त्या दृष्टीने आपण सर्वांनी कामाला लागणे गरजेचे आहे. राज्यात वाढलेली महागाई, बेरोजगारी, महिलांवरील वाढते अत्याचार याचा उल्लेख करुन त्यांनी आपल्या खास शैलीत सत्ताधार्यांचा खरपूस समाचार घेतला. आगामी सर्वच निवडणुकांत फ ुटीर व गद्दारांना धडा शिकवावा, असे आवाहन केले.

यावेळी पदाधिकार्यांशी संवाद साधतांना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, आपल्या घरदार व कुटूंबांची जबाबदारी सांभाळून म हिला भगिनी शिवसेना पक्षात मोठ्या हिरीरीने काम करतात. पक्षानेही आतापर्यंत अनेक वेळा त्यांना वेगवेगळ्या पदावर बसून सन्मान केला. आगामी काळात होणाऱ्या सर्वच निवडणुकांत महिलांना मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.



यामुळे महिलांनी शिवसेना पक्षात काम करावे, पक्ष संघटन वाढवावे, असे सांगून त्यांनी उपस्थित पदाधिकारी महिलांचा गौरवपुर्ण उल्लेख केला. शिवसेना पक्ष हा सामान्य, वंचित घटकाला न्याय देणारा पक्ष आहे. म हिलांनी आपले संघटन वाढवून गावा-गावात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शाखा सुरु कराव्यात, असे आवाहन जिल्हाप्रमुख अंबेकरांनी केले. याच कार्यक्रमात शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनीही महिलांशी संवाद साधला. मोठ्या संख्येने उपस्थित महिलांचे कौतुक केले. यावेळी शिवसेना शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, माजी नगरसेविका मिनाताई घुगे, रोहिणी तोगे, शिला शहाने, बेबीताई पावसे, योगिता शिंदे, शितल मुरकुटे, आरती काळे, गयाबाई पवार, कुंतीका भुसारे, लता वेलदोडे, रुख्मिनी घोडके यांच्यासह मोठ्या संख्येने जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, मंठा, परतुर, अंबड, घनसावंगी तालुक्यातून महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा महिला संघटक मंगल मेटकर यांनी केले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.